RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक ३७] मंगळवार, सप्टेंबर २६, २०२३/आश्विन ४, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . . . . . . . . . | १-४ |

**वित्त विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ सप्टेंबर २०२३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2023.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१७ चा महा. ४३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) कलम १ तात्काळ अंमलात येईल आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येतील :

परंतु, या अध्यादेशाच्या वेगवेगळ्या तरतुदींकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदीमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात येण्याचा संदर्भ म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,— २०१७ चा महा. ४३.

(क) खंड (८०) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (८०क) " ऑनलाईन खेळ " याचा अर्थ, इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक नेटवर्कवर एखादा खेळ देऊ करणे, असा आहे आणि त्यात, ऑनलाईन पैशाच्या खेळाचा समावेश होतो ;

(८०ख) " ऑनलाईन पैशाचा खेळ " याचा अर्थ, खेळ, योजना, स्पर्धा किंवा अन्य कोणताही उपक्रम किंवा प्रक्रिया यांसह खेळाच्या कोणत्याही स्पर्धा प्रकारामध्ये,— मग त्याची फलनिष्पत्ती किंवा कामगिरी कौशल्यावर, संधीवर किंवा या दोन्हींवर आधारित असो किंवा नसो आणि ते, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगीयोग्य किंवा अन्यथा असो,— ज्यामध्ये खेळाडू, आभासी डिजिटल मत्तांसह पैसे किंवा पैशाचे मूल्य जिंकण्याच्या अपेक्षेने, आभासी डिजिटल मत्तांसह पैसे किंवा पैशाचे मूल्य प्रदान करतात किंवा जमा करतात असा ऑनलाईन खेळ, असा आहे ; ";

(ख) खंड (१०२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१०२क) " विनिर्दिष्ट केलेला कारवाईयोग्य मागणीहक्क " याचा अर्थ,—

(एक) सट्टेबाजी ;

(दोन) कॅसिनो ;

(तीन) जुगार ;

(चार) घोड्यांची शर्यत ;

(पाच) लॉटरी ; किंवा

(सहा) ऑनलाईन पैशाचा खेळ,

यांमध्ये किंवा त्याच्या परिणामी उद्‌भवलेला कारवाईयोग्य मागणीहक्क, असा आहे ; ";

(ग) खंड (१०५) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जी व्यक्ती, पुरवठ्याकरिता डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मची मालक आहे, तो चालविते किंवा त्याचे व्यवस्थापन करते अशा व्यक्तीसह, जी व्यक्ती, विनिर्दिष्ट केलेल्या कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या अशा पुरवठ्याचे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आयोजन करते किंवा व्यवस्था करते अशी व्यक्ती, अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या, मग असे कारवाईयोग्य मागणीहक्क तिच्याद्वारे किंवा तिच्यामार्फत पुरवठा केले जात असो आणि अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या पुरवठा करण्यासाठी अशा आभासी डिजिटल मत्तांसह पैशामध्ये किंवा पैशाच्या मूल्यामध्ये मोबदला, तिला किंवा तिच्यामार्फत प्रदान केला जात असो किंवा अभिहस्तांतरित केला जात असो अथवा कोणत्याही रीतीने तिच्या स्वाधीन केला जात असो,— पुरवठादार असल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, जणू काही ती, अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या पुरवठ्याच्या संबंधातील कर प्रदान करण्यास पात्र असलेली पुरवठादार आहे असे समजून, विनिर्दिष्ट केलेल्या कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या अशा पुरवठ्यास, लागू असतील ; ";

(घ) खंड (११७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (११७क) " आभासी डिजिटल मत्ता " यास, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम २ च्या खंड (४७क) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल ; ". १९६१ चा ४३.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,—

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २४ ची सुधारणा.

(क) खंड (अकरा) मधील, शेवटी आलेला " आणि " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (अकरा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अकरा-क) भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारतातील एखाद्या व्यक्तीला ऑनलाईन पैशांच्या खेळाचा पुरवठा करणारी प्रत्येक व्यक्ती ; आणि ".

**४.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची तीन मधील, परिच्छेद ६ मध्ये, " लॉटरी, सट्टेबाजी व जुगार " या मजकुराऐवजी, " विनिर्दिष्ट केलेले कारवाईयोग्य मागणीहक्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची तीन ची सुधारणा.

**५.** या अध्यादेशान्वये केलेल्या सुधारणांमुळे, सट्टेबाजी, कॅसिनो, जुगार, घोड्यांची शर्यत, लॉटरी किंवा ऑनलाईन खेळ यांस मनाई करण्यासाठी, त्यांवर निर्बंध घालण्यासाठी किंवा त्यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणाऱ्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाधा येणार नाही.

संक्रमणात्मक तरतुदी.

## निवेदन

वस्तू व सेवा कर परिषदेने, तिच्या ५० व ५१ व्या बैठकींमध्ये, कॅसिनो, घोड्यांची शर्यत व ऑनलाईन खेळ यांच्या करपात्रतेशी संबंधित असणाऱ्या विषयांबाबत विविध संघटनांकडून प्राप्त झालेली निवेदने विचारात घेतली आहेत आणि कॅसिनो, घोड्यांची शर्यत व ऑनलाईन खेळ यांच्या करपात्रतेच्या संबंधात स्पष्टता आणण्यासाठी विवक्षित सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार, केंद्रीय वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२३ (२०२३ चा ३०) याद्वारे संसदेकडून केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १२) यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (सन २०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदी लागू करण्यामध्ये एकरूपता राखण्यासाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे.

२. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामधील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेतः—

(एक) " ऑनलाईन खेळ ", " ऑनलाइन पैशाचा खेळ ", " विनिर्दिष्ट केलेला कारवाईयोग्य मागणीहक्क " आणि " आभासी डिजिटल मत्ता " या शब्दप्रयोगांची व्याख्या करणे ;

(दोन) " विनिर्दिष्ट केलेला कारवाईयोग्य मागणीहक्क " याच्या पुरवठ्याच्या बाबतीत " पुरवठादार " यासंबंधात स्पष्टता आणण्याची तरतूद करण्यासाठी " पुरवठादार " या व्याख्येमध्ये परंतुक समाविष्ट करणे ;

(तीन) भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारतातील एखाद्या व्यक्तीला ऑनलाईन पैशाच्या खेळाचा पुरवठा करण्यासाठी व्यक्तीची अनिवार्यपणे नोंदणी करण्यासाठी, या अधिनियमाच्या कलम २४ मध्ये नवीन खंड समाविष्ट करणे ; आणि

(चार) कॅसिनो, घोड्यांची शर्यत व ऑनलाईन खेळ यांमध्ये किंवा त्यांच्या परिणामी उद्‌भवणाऱ्या कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या करपात्रतेसंबंधात स्पष्टता आणण्याची तरतूद करता यावी म्हणून, या अधिनियमाच्या अनुसूची तीनच्या परिच्छेद ६ ची सुधारणा करणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**रमेश बैस,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २६ सप्टेंबर २०२३.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. नितिन करीर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.